नारिंगी पारपत्राचा निर्णय रद्द

पत्ता असलेले शेवटचे पानही पूर्वीप्रमाणेच छापले जाणार; तीन सदस्यांच्या समितीचा निर्णय

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

'इमिग्रेशन चेक रिक्वायर्ड' (ईसीआर) या वर्गवारीकरिता नारिंगी रंगाचे पारपत्र (पासपोर्ट) जारी करण्याच्या निर्णयाला झालेला विरोध लक्षात घेऊन केंद्र सरकारने मंगळवारी हा निर्णय रद्द केल्याचे जाहीर केले. तसेच पारपत्राच्या अखेरीस असणारे धारकाचा पत्ता लिहिलेले पानही पूर्ववत छापण्यात येणार असल्याचे सांगितले.

अशा प्रकारच्या ईसीआर वर्गवारीतील पारपत्र धारकांना नारिंगी रंगाचे पारपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच १२ जानेवारी रोजी परराष्ट्र मंत्रालयाने जाहीर केले होते, की पत्ता लिहिलेले अखेरचे पान नव्या पारपत्रांमध्ये छापले जाणार नाही. मात्र या निर्णयाला अनेक स्तरांतून विरोध झाला. ईसीआर वर्गवारीतील पारपत्र धारकांना वेगळ्या रंगाचे पारपत्र देणे म्हणजे दुजाभाव करण्यासारखे आहे, असा आरोप करण्यात आला. तसेच पारपत्रावर पत्ता छापला नाही तर पारपत्र पत्त्याचा दाखला म्हणून वापरता येणार नाही, असाही आक्षेप घेतला गेला.

यावर उपाय सुचवण्यासाठी परराष्ट्र आणि महिला व बालकल्याण मंत्रालयातील तीन सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. या समितीने विचारविनिमय केल्यानंतर २९ जानेवारी रोजी त्यांची परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज आणि परराष्ट्र राज्यमंत्री व्ही. के. सिंग यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्यामध्ये ईसीआर वर्गवारीतील धारकांना नारिंगी पारपत्र न देण्याचा आणि पत्ता लिहिलेले शेवटचे पान पूर्वीप्रमाणेच छापण्याचा निर्णय घेण्यात आला, असे मंगळवारी परराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

ईसीआर वर्गवारी म्हणजे काय?

भारतातील १९८३ च्या इमिग्रेशन कायद्यानुसार ईसीआर वर्गवारीतील पारपत्र धारकांना ठरावीक १८ देशांत प्रवास करायचा असल्यास परदेशस्थ भारतीय व्यवहार मंत्रालयाच्या (मिनिस्ट्री ऑफ ओव्हरसीज इंडियन अफेअर्स) प्रोटेक्टर ऑफ इमिग्रंट्स कार्यालयाकडून परदेश प्रवासासाठी खास परवानगी घ्यावी लागते. या यादीत संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, कतार, ओमान , कुवेत, बहरीन, मलेशिया, लिबिया, जॉर्डन, येमेन, सुदान, अफगाणिस्तान, इंडोनेशिया, सीरिया, लेबनॉन, थायलंड आणि इराक या १८ देशांचा समावेश आहे.

'वहनयोग्यता' प्रमाणपत्र घोटाळा

याचिकाकर्त्याला भरपाई देण्यात सरकारचा कोतेपणा

मुजोरीबाबत न्यायालयाचा संताप; परिणाम भोगावे लागण्याचाही इशारा

प्रतिनिधी, मुंबई

आरटीओ कार्यालयात 'वहनयोग्यता' प्रमाणपत्र देण्यात होणारा घोटाळा उघडकीस आणणारे पुणे येथील याचिकाकर्ते श्रीकांत कर्वे यांना या संपूर्ण प्रकरणाची माहिती मिळवण्यासाठी आणि कायदेशीर लढाईसाठी आलेल्या खर्चापोटी एक लाख रुपये देण्याचे आदेश न्यायालयाने नोव्हेंबरमध्ये दिले होते. मात्र न्यायालयाने आदेश देऊनही कर्वे यांना ही रक्कम देणार नाही, असा निर्णय परिवहनमंत्री आणि सचिवांनी घेतला. एवढ्यावरच न थांबता न्यायालयाने आपल्या या आदेशाचा फेरविचार करावा, या मागणीसाठी सरकारने याचिकाही केली. मात्र सरकारच्या या भूमिकेबाबत उच्च न्यायालयाने मंगळवारी तीव्र संताप व्यक्त केला. तसेच सरकारने आपली ही भूमिका कायम ठेवली तर परिणामांना सामोरे जाण्यास तयार राहण्याचा इशाराही न्यायालयाने दिला.

'वहनयोग्यता' प्रमाणपत्र देण्याबाबत कायद्याची आणि आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे वारंवार बजावले आहे. असे असतानाही वाहनांची तपासणी न करताच दिवसाला शेकडो वाहनांना 'वहनयोग्यता' प्रमाणपत्र देण्याचे आरटीओ कार्यालयातील विविध घोटाळे एकामागोमाग न्यायालयासमोर उघड झाले. सरकारने हा घोटाळा होत असल्याची कबुलीही दिली आहे. परंतु भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी सरकारकडून त्याकडे काणाडोळा करण्यात आला. आदेशाची अंमलबजावणी करण्यातही सरकारची उदासीनता कायम राहिली.

न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती पी. एन. देशमुख यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी या प्रकरणी सुनावणी झाली. त्या वेळी आपल्याला अजून खर्चाची रक्कम मिळाली नसल्याची तक्रार कर्वे यांनी न्यायालयाकडे केली. शिवाय ही रक्कम मिळणार नाही, असेही आपल्याला कळवण्यात आल्याचे त्यांनी न्यायालयाला सांगितले. एरव्ही आदेशाच्या अंमलबजावणी कशी करायची याबाबतच्या चर्चेसाठी वेळ नसलेले परिवहनमंत्री आणि सचिवांनी बैठक घेऊन सरकार असे पैसे देणार नाही, असा निर्णय घेतल्याचा आरोपही त्यांनी केला. एवढेच नव्हे, तर पैशांबाबतच्या आदेशाचा फेरविचार करण्यासाठी सरकारने याचिकाही केल्याची माहिती न्यायालयाला दिली.

...तर प्रत्येक दिवसाचा खर्च आकारणार

सरकारी वकिलांकडूनही या सगळ्यांवर समाधानकारक उत्तर न मिळाल्याने न्यायालयाने सरकारच्या भूमिकेबाबत तीव्र संताप व्यक्त केला. आरटीओत होणारा घोटाळा याचिकाकर्त्याने समोर आणला. त्यासाठी त्यांना आलेल्या खर्चाकरिता ते पात्र आहेत. मात्र सरकार जर ही रक्कम देण्यातही एवढे कोतेपणा करत असेल तर प्रत्येक दिवसाचा खर्च आकारला जाईल. तसेच याबाबतचा न्यायालयाचा निर्णय पटत नव्हता तर सर्वोच्च न्यायालयात त्याला आव्हान देण्याचा पर्याय सरकारकडे उपलब्ध होता. मात्र निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी याचिका करून त्यावर ठाम राहण्याचे परिणाम भोगण्यसही तयार राहण्याचा इशारा न्यायालयाने दिला.

पालिका विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी मदत केंद्र

मुंबई : पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी, तसेच त्यांना तात्काळ उपचार मिळावेत या उद्देशाने पालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये स्वतंत्र मदत केंद्र उभारण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी ३१ तपासणी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहेत.

पालिका शाळांमध्ये गरीब कुटुंबातील मुले शिक्षण घेण्यासाठी येतात. या विद्यार्थ्यांची दरवर्षी पालिकेमार्फत वैद्यकीय तपासणी केली जाते. या तपासणी दरम्यान विद्यार्थी आजारी असल्याचे आढळल्यास तात्काळ त्याच्यावर उपचार करण्यात येतात. केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित केले असून विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमाची आखणी केली आहे. या कार्यक्रमाअंतर्गत पालिका शाळांतील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणी करण्यासाठी ३१ पथके स्थापन करण्यात आली आहेत.

जिया खान आत्महत्या प्रकरण

सूरज पांचोलीवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप

मुंबई : अभिनेत्री जिया खान हिच्या आत्महत्येप्रकरणी तिचा खास मित्र अभिनेता सूरज पांचोली याच्यावर मंगळवारी जियाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप विशेष महिला न्यायालयाने निश्चित केला. सूरजने हा आरोप अमान्य असल्याचे सांगितल्याने १४ फेब्रुवारीपासून त्याच्याविरूद्धच्या खटल्याला सुरूवात होणार आहे.

खासगी न्याय्यवैद्यक प्रयोगशाळेच्या वैद्यकीय अहवालाचा दाखला देत जियाने आत्महत्या केली नाही, तर तिची हत्या करण्यात आली होती, असा आरोप तिची आई राबिया हिने केला. विशेष महिला न्यायालयाने सूरजवर जियाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप निश्चित केला.

शासकीय मुद्रण तंत्र संस्था, मुंबई
सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट कैंपस, डॉ. डी. एन. रोड, छत्रपति शिवाजी टरमीनस समोर (C.S.T.), मुंबई - ०१.
५ ते ७ आठवड्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Laptop Assembly & Maintenance Rs. 6500/-
Computer Hardware Assembly with Networking etc. Rs. 3000/-
Mobile Repairing & Maintenance Rs. 6500/-
CCTV Camera Installation & Troubleshooting Rs. 4000/-
(022)22682072 / 9820840968
GST Extra/ as Applicable

26 अतिरिक्त उपनगरीय सेवांची दिनांक ३१.१.२०१८ पासून सुरुवात

मध्य रेल्वे ३१.१.२०१८ पासून २६ अतिरिक्त उपनगरीय सेवा सुरु करत आहे. उपनगरीय हार्बर लाइन वर १० सेवा आणि ट्रान्सहार्बर लाइन १६ सेवा सुरु होईल.
- हार्बर लाइनची एकूण सेवा ६०४ वरून ६१४ पर्यंत वाढतील
- ट्रान्स हार्बरच्या एकूण सेवा २४६ वरून २६२ पर्यंत वाढतील
- मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील एकूण उपनगरीय सेवा १७०६ वरून १७३२ पर्यंत वाढतील.

अतिरिक्त उपनगरीय सेवांचे विवरण निम्नानुसार आहे

डाउन हार्बर लाइन सेवा

पासून	प्रस्थान	पर्यंत	आगमन
वडाळा रोड	०७.३९ वाजता	पनवेल	०८.४१ वाजता
वडाळा रोड	१०.४० वाजता	पनवेल	११.४२ वाजता
वडाळा रोड	१२.३९ वाजता	वाशी	१३.१० वाजता
वडाळा रोड	१४.३४ वाजता	वाशी	१५.०५ वाजता
वडाळा रोड	१७.०१ वाजता	पनवेल	१८.०३ वाजता

अप हार्बर लाईन सेवा

पासून	प्रस्थान	पर्यंत	आगमन
वाशी	०६.४७ वाजता	वडाळा रोड	०७.१८ वाजता
पनवेल	०९.१६ वाजता	वडाळा रोड	१०.१८ वाजता
पनवेल	११.२८ वाजता	वडाळा रोड	१२.२९ वाजता
वाशी	१३.३४ वाजता	वडाळा रोड	१४.०६ वाजता
वाशी	१६.०६ वाजता	वडाळा रोड	१६.३८ वाजता

डाउन ट्रान्सहार्बर लाइन सेवा

पासून	प्रस्थान	पर्यंत	आगमन
ठाणे	०९.१४ वाजता	पनवेल	१०.०६ वाजता
ठाणे	१५.०५ वाजता	नेरुळ	१५.३५ वाजता
ठाणे	१५.५२ वाजता	वाशी	१६.२३ वाजता
ठाणे	१६.१९ वाजता	वाशी	१६.४८ वाजता
ठाणे	१७.१६ वाजता	नेरुळ	१७.४६ वाजता
ठाणे	१८.१० वाजता	पनवेल	१९.०१ वाजता
ठाणे	२०.२० वाजता	नेरुळ	२०.५० वाजता
ठाणे	२१.३६ वाजता	पनवेल	२२.२८ वाजता

अप ट्रान्सहार्बर लाईन सेवा

पासून	प्रस्थान	पर्यंत	आगमन
पनवेल	०८.१५ वाजता	ठाणे	०९.०८ वाजता
पनवेल	१०.१५ वाजता	ठाणे	११.०५ वाजता
वाशी	१५.११ वाजता	ठाणे	१५.४० वाजता
नेरुळ	१५.४५ वाजता	ठाणे	१६.१५ वाजता
वाशी	१६.३१ वाजता	ठाणे	१७.०० वाजता
नेरुळ	१७.५४ वाजता	ठाणे	१८.२४ वाजता
पनवेल	१९.१८ वाजता	ठाणे	२०.११ वाजता
नेरुळ	२०.५८ वाजता	ठाणे	२१.२८ वाजता

अतिरिक्त उपनगरीय सेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने खालील डाउन आणि अप ट्रान्स हार्बर रेल्वे सेवेच्या वेळेत बदल होईल

डाउन ट्रान्सहार्बर लाईन सेवेच्या वेळेत बदल

पासून	पर्यंत	सध्याचे प्रस्थान	सुधारित प्रस्थान
ठाणे	वाशी	१४.४१ वाजता	१४.४६ वाजता
ठाणे	वाशी	१५.४७ वाजता	१५.४० वाजता
ठाणे	वाशी	१७.१४ वाजता	१७.०८ वाजता
ठाणे	नेरुळ	१८.१२ वाजता	१८.१७ वाजता

अप ट्रान्सहार्बर लाइन सेवेच्या वेळेत बदल

पासून	पर्यंत	सध्याचे प्रस्थान	सुधारित प्रस्थान
वाशी	ठाणे	१५.१८ वाजता	१५.२३ वाजता
वाशी	ठाणे	१६.२६ वाजता	१६.१९ वाजता
नेरुल	ठाणे	१७.४७ वाजता	१७.४१ वाजता
वाशी	ठाणे	१७.५३ वाजता	१७.४८ वाजता

सध्याच्या हार्बर लाइन सेवांच्या वेळेत कोणताही बदल होणार नाही

मध्य रेल्वे
www.cr.indianrailways.gov.in
1005
www.twitter.com/central_railway www.facebook.com/centralrailwayindia

क्षेत्रीय कार्यालय (महाराष्ट्र)
कर्मचारी राज्य विमा निगम
(एक आयएसओ ९००१:२००८ प्रमाणित संघटना)
१०८, पंचदीप भवन, एन.एम.जोशी मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३.
टेलि क्र.: ०२२-६१२ ०९७ ७५, फॅक्स : ०२२-२४९ २१ ७०१ / ६१२ ०९ ७४१

नं.३१-डब्ल्यू-२०/१३/टेंडर-१६-१७/कन्स्ट्रक्शन/१६ तारीख : १८.०१.२०१८

ई-निविदा मागविणारी सूचना

निविदा कागदपत्रात दिलेली मार्गदर्शक सूत्रे व शर्ती व अटींनुसार **एक वर्षा**करिता ईएसआयसीनगर स्टाफ क्वॉर्टर्स, डी.एन.नगर, अंधेरी (प.), मुंबई व स्टाफ क्वॉर्टर्स व ऑफिस गोरेगाव, मुंबई येथील **स्थापत्य कामांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल** याकरिता अग्रेसर स्थापत्य दुरुस्ती व देखभाल कामातील एजन्सीजकडून ई-प्रापण सोल्यूशन्सद्वारा द्वि-बोली पद्धतीत ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा कागदपत्रे **https://esictenders.proc.in** यावर **०२.०२.२०१८** पासून ऑनलाइन उपलब्ध आहेत. विद्युत कामांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल याकरिता अदमासे मूल्य **२,२४,८८,३१५/-** आहे. बोलीदारांनी मुंबई येथे देय ''ईएसआय फंड अकाऊंट नं. १'' यांच्या नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्ट/ बँकर्स चेकच्या स्वरूपात **रु. ४,४९,७६६/-** ची इसारा रक्कम ठेव (इरठे) जमा करावयाची आहे.

अनु. क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च (रु.)	इसारा रक्कम (रु.)	कामाच्या पूर्ततेकरिता दिलेला कालावधी
१)	स्थापत्य कामांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल ठिकाण : १. ईएसआयसीनगर, स्टाफ क्वॉर्टर्स, डी.एन.नगर, अंधेरी (प.), मुंबई. एक वर्षाकरिता. २. स्टाफ क्वॉर्टर्स व ऑफिस गोरेगाव (प.), मुंबई. एक वर्षाकरिता.	२,२४,८८,३१५/-	४,४९,७६६/-	एक वर्ष

स्वारस्य असलेल्या निविदाकारांनी **https://esictenders.proc.in** या ई-निविदा पोर्टलवरून त्यांच्या तांत्रिक बोलींच्या पुष्ट्यर्थ सर्व संबंधित प्रमाणपत्रे, कागदपत्रे, इ.च्या डिजिटल पद्धतीत स्कॅन्ड केलेल्या प्रतींसमवेत त्यांच्या तांत्रिक व वित्तीय बोली उशिरात उशिरा **२३.०२.२०१८** रोजी सायं. **०५.०० वा.**पर्यंत अपलोड कराव्यात. बोली **२६.०२.२०१८** रोजी **दु. ०३.०० वा.** उघडण्यात येतील. निविदा कागदपत्रे कर्मचारी राज्य विमा निगमच्या संकेतस्थळावर म्हणजेच **www.esic.nic.in** व **www.esicmaharashtra.gov.in** यावरून डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध आहेत.

स्वाक्षरी/-
अतिरिक्त आयुक्त

डीएव्हीपी २३११९/११/०००६/१७१८

क्षेत्रीय कार्यालय (महाराष्ट्र)
कर्मचारी राज्य विमा निगम
(एक आयएसओ ९००१:२००८ प्रमाणित संघटना)
१०८, पंचदीप भवन, एन.एम.जोशी मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३.
टेलि क्र.: ०२२-६१२ ०९७ ७५, फॅक्स : ०२२-२४९ २१ ७०१ / ६१२ ०९ ७४१

नं.३१-डब्ल्यू-२०/१३/टेंडर-१६-१७/कन्स्ट्रक्शन/१६ तारीख : १८.०१.२०१८

ई-निविदा मागविणारी सूचना

निविदा कागदपत्रात दिलेली मार्गदर्शक सूत्रे व शर्ती व अटींनुसार **एक वर्षा**करिता ईएसआयसीनगर स्टाफ क्वॉर्टर्स, डी.एन.नगर, अंधेरी (प.), स्टाफ क्वॉर्टर्स व ऑफिस गोरेगाव, मुंबई येथील **विद्युत कामांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल** याकरिता अग्रेसर विद्युत दुरुस्ती व देखभाल कामातील एजन्सीजकडून ई-प्रापण सोल्यूशन्सद्वारा द्वि-बोली पद्धतीत ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा कागदपत्रे **https://esictenders.proc.in** यावर **०२.०२.२०१८** पासून ऑनलाइन उपलब्ध आहेत. विद्युत कामांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल याकरिता अदमासे मूल्य **१२,११,०७८/-** आहे. बोलीदारांनी मुंबई येथे देय ''ईएसआय फंड अकाऊंट नं. १'' यांच्या नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्ट/ बँकर्स चेकच्या स्वरूपात **रु. २४,२२२/-** ची इसारा रक्कम ठेव (इरठे) जमा करावयाची आहे.

अनु. क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च (रु.)	इसारा रक्कम (रु.)	कामाच्या पूर्ततेकरिता दिलेला कालावधी
१)	विद्युत कामांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल ठिकाण : १. ईएसआयसीनगर, स्टाफ क्वॉर्टर्स, डी.एन.नगर, अंधेरी (प.), मुंबई. एक वर्षाकरिता. २. स्टाफ क्वॉर्टर्स व ऑफिस गोरेगाव (प.), मुंबई. एक वर्षाकरिता.	१२,११,०७८/-	२४,२२२/-	एक वर्ष

स्वारस्य असलेल्या निविदाकारांनी **https://esictenders.proc.in** या ई-निविदा पोर्टलवरून त्यांच्या तांत्रिक बोलींच्या पुष्ट्यर्थ सर्व संबंधित प्रमाणपत्रे, कागदपत्रे, इ.च्या डिजिटल पद्धतीत स्कॅन्ड केलेल्या प्रतींसमवेत त्यांच्या तांत्रिक व वित्तीय बोली उशिरात उशिरा **२३.०२.२०१८** रोजी सायं. **०५.०० वा.**पर्यंत अपलोड कराव्यात. बोली **२६.०२.२०१८** रोजी **दु. ०३.०० वा.** उघडण्यात येतील. निविदा कागदपत्रे कर्मचारी राज्य विमा निगमच्या संकेतस्थळावर म्हणजेच **www.esic.nic.in** व **www.esicmaharashtra.gov.in** यावरून डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध आहेत.

स्वाक्षरी/-
अतिरिक्त आयुक्त

डीएव्हीपी २३११९/११/०००५/१७१८

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट
(यांत्रिकी आणि विद्युत अभियांत्रिकी विभाग)
ISO 9001:2015, ISO 27001:2013, ISO 14001:2015, OHSAS 18001:2007 CERTIFIED

निविदा सूचना

''जेएनपीटी येथे दूसन मेकचे 12 रबर टायर गॅन्ट्री क्रेन्सच्या यांत्रिक स्टील संरचनेवर रंग लावणे, पेन्ट्सचा पुरवठा आणि पृष्ठभागाची तयारी'' करीता जेएनपीटी दोन बोली प्रणाली मध्ये ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करीत आहेत. विस्तृत निविदा सूचना जेएनपीटीची वेबसाईट http://www.jnport.gov.in आणि विस्तृत ऑनलाईन निविदा http://eprocure.gov.in/eprocure/app वर उपलब्ध आहे.

मुख्य व्यवस्थापक (यांत्रिकी आणि विद्युत अभियांत्रिकी)

सीजी पॉवर अॅण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेड
(क्रॉम्प्टन ग्रीव्हज् लिमिटेड पूर्वी)
सीआयएन: L99999MH1937PLC002641
नोंदणीकृत कार्यालय: ६वा मजला, सीजी हाऊस, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - 400 030
दुरध्वनी नं.: 022 - 24237777 फॅक्स नं: 022-24237545
ई-मेल: investorservices@cgglobal.com वेबसाईट: www.cgglobal.com

सूचना

सिक्युरिटीज अॅन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूचीकरण आबंधन आणि प्रकटन आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन ४७ च्या अनुरोधाने, ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ३१ डिसेंबर, २०१७ रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाही आणि नऊमाही अखेरचे अ-लेखापरीक्षित वित्तीय निकाल, स्वतंत्र तसेच एकत्रित अशा तत्त्वांवर, इतर व्यवसायासोबत, विचार आणि मंजूरी घेण्यासाठी कंपनीच्या संचालकीय मंडळाची बैठक ही सोमवार, १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी घेण्यात येईल.

सीजी पॉवर अॅण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेड करिता
रूची खन्ना
अनुपालन अधिकारी

स्थळ : मुंबई
दिनांक : ३० जानेवारी, २०१८
स्टॉक इक्सचेंजेसची वेबसाईट: www.bseindia.com/www.nseindia.com

ठाणे महानगरपालिका, ठाणे
(सा.बां. विभाग, ठाणे)
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कोपरी प्रभाग समितीच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ''उद्यान विकास सुशोभिकरण'' या लेखाशिर्षक अंतर्गत ''कोपरी परिसरातील मो.दा.जोशी बालोद्यानामधील ढासळलेली आधारभिंत नव्याने बांधणे'' या एका कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्व. उपक्रम, स्थानिक संस्था महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत/काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करणेत आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https:// mahatenders.gov.in वर दि.३१/०१/१८ ते दि.२०/०२/१८ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि. २०/०२/१८ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि. २१/०२/१८ रोजी सायं.१६.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधीं समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-नौपाडा- को/१६०२ /१७-१८ सही/-
दि:३०.०१.२०१८ कार्यकारी अभियंता
pls visit our official web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.
गृहे सौख्यम् विराजते
तुमच्या स्वप्नातील घराकडे जाणारा रस्ता
सीआयएन नं. : एल६५९२२एमएच१९८९पीएलसी०५४५८३
नोंदणी कार्यालय : ६वा मजला, नॅशनल इन्श्युरन्स बिल्डिंग, १४, जमशेठजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.
वेबसाइट : www.gichfindia.com

डिसेंबर ३१, २०१७ रोजी संपलेल्या त्रैमासिक/नऊ महिन्यांसाठी एकमेव अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण (₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेले त्रैमासिक			संपलेले नऊ महिने		संपलेले वर्ष
	३१.१२.२०१७ (समीक्षित)	३०.०९.२०१७ (समीक्षित)	३१.१२.२०१६ (समीक्षित)	३१.१२.२०१७ (समीक्षित)	३१.१२.२०१६ (समीक्षित)	३१.०३.२०१७ (लेखापरीक्षित)
उत्पन्न						
कार्यामधून उत्पन्न	२८,११८	२७,३९२	२५,२८७	८३,०१७	७३,४१९	१००,०२१
अन्य कार्यांतील उत्पन्न (गुंतवणूक उत्पन्नासह)	३१	१९	२०	१२३	९२	१५३
एकूण उत्पन्न	**२८,१४९**	**२७,४११**	**२५,३०७**	**८३,१४०**	**७३,५११**	**१००,१७४**
खर्च						
वित्तीय खर्च	१८,२२४	१७,४५९	१७,१५८	५२,५९८	५०,१५८	६६,७८४
कर्मचारी हितासाठी खर्च	७२२	६९४	६५९	२,०८८	२,००४	२,५९५
घसारा आणि परिशोधन	१७	१९	१८	४७	४९	७०
इतर खर्च	२,७३९	२,८१४	२,१९९	९,३५०	५,७३१	८,०१५
एकूण खर्च	**२१,७०२**	**२०,९८६**	**२०,०३४**	**६४,०८३**	**५७,९४२**	**७७,४६४**
इतर उत्पन्न आणि अतिविशिष्ट बाबींपूर्व कार्यामधून नफा	**६,४४७**	**६,४२५**	**५,२७३**	**१९,०५७**	**१५,५६९**	**२२,७१०**
इतर उत्पन्न आणि अतिविशिष्ट प्रकार						
इतर उत्पन्न आणि अतिविशिष्ट प्रकार	-	-	-	-	-	-
करपूर्व सामान्य कार्यामधून नफा	**६,४४७**	**६,४२५**	**५,२७३**	**१९,०५७**	**१५,५६९**	**२२,७१०**
कराराठी तरतूद	२,३००	२,३१३	१,९१०	७,१८०	५,३२०	७,६३५
थकीत कर (संपत्ती)/देणी	(७२)	(८३)	(८०)	(५७९)	१३७	३०२
करपश्चात निव्वळ नफा	**४,२१९**	**४,१९५**	**३,४४३**	**१२,४५६**	**१०,११२**	**१४,७७३**
भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १०)	५,३८५	५,३८५	५,३८५	५,३८५	५,३८५	५,३८५
मार्च ३१ अनुसार राखीव						**७८,४३७**
प्रतिभाग उत्पन्न (ईपीएस)						
ए) कालावधीकरिता अतिविशिष्ट बाबींपूर्व प्रति भाग मूळ आणि सौम्यीकृत उत्पन्न (₹)	७.८३	७.७९	६.३९	२३.१३	१८.७८	**२७.४३**
बी) कालावधीकरिता अतिविशिष्ट बाबींपश्चात प्रति भाग मूळ आणि सौम्यीकृत उत्पन्न (₹)	७.८३	७.७९	६.३९	२३.१३	१८.७८	**२७.४३**

टिपा :
१. डिसेंबर ३१, २०१७ रोजी संपलेले त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी उपरोक्त निष्कर्षांचे कंपनीच्या लेखापरीक्षकांद्वारे 'मर्यादित समीक्षण' करण्यात आले आहे आणि संचालकांच्या लेखा समितीद्वारे पुन्हा समीक्षण करण्यात आले आहे आणि शिफारस करण्यात आली आहे आणि त्यानंतर संचालक मंडळाद्वारे सेबी (लिस्टिंग अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट), नियमावली २०१५च्या नियमावली ३३च्या शर्तींनुसार जानेवारी ३०, २०१८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूर करण्यात आले.
२. निवासी मालमत्तेच्या खरेदीसाठी किंवा बांधकामासाठी कर्जाची तरतूद करणे हा कंपनीचा प्रमुख व्यवसाय आहे. अन्य सर्व कार्ये ही मुख्य व्यवसायाशी संबंधित आहेत. त्यामुळे कंपनीज (अकाऊन्ट्स) नियम, २०१६च्या नियम ७सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा, २०१३च्या कलम १३३च्या अंतर्गत नमूद करण्यात आलेल्या विभागीय अहवाल (एएस १७) वरील अकाऊन्टिंग स्टॅण्डर्ड अनुसार वेगळ्या विभागीय अहवालाची गरज नाही.
३. डिसेंबर ३१, २०१७ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी 'इतर खर्च' यामध्ये प्रमाणित मालमत्तेच्या आणि नॉन परफॉर्मिंग अॅसेटसाठीच्या ₹ १,४६२/- लाख आणि (गत कालावधीच्या त्रैमासिकासाठी करण्यात आलेल्या ₹ १,२५२/- लाखांची करण्यात आलेली तरतूद) यांचा समावेश आहे. डिसेंबर ३१, २०१७ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांसाठी 'इतर खर्च' यामध्ये प्रमाणित मालमत्तेच्या आणि नॉन परफॉर्मिंग अॅसेटसाठीच्या ₹ ५,५१२/- लाख आणि (गत कालावधीच्या नऊ महिन्यांसाठी करण्यात आलेल्या ₹ २,४५२/- लाखांची करण्यात आलेली तरतूद) यांचा समावेश आहे.
४. डिसेंबर ३१, २०१७ अनुसार सुरक्षित सूचिबद्ध अपरिवर्तनीय कर्जरोख्यांच्या वर कंपनीने १००% अॅसेट कव्हर ठेवले आहे.
५. गत कालावधीचे आकडे आवश्यक तिथे पुनर्गठित/ पुनर्वर्गीकृत करण्यात आले आहेत.

संचालक मंडळाच्या वतीने आणि करिता
सही/-
एस. गोपाकुमार
व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ
डीआयएन क्र. : ०७५४२३५६

ठिकाण : मुंबई
दिनांक : जानेवारी ३०, २०१८